यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

दूरध्वनी :- (०२५३) २२३१७१४/२२३१७१५/२२३०२२७/२२३००१३ २२३००१३ फॅक्स (०२५३)२२३०२९८

जावक क्र: एचएक्स/परीक्षा कक्ष- २/ /२०१९ दिनांक:- ७ जानेवारी २०१९

प्रति,
मा. केंद्र प्रमुख / केंद्र संयोजक
य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र

अत्यंत महत्वाचे

विषय :- फेब्रुवारी २०१९ परीक्षेच्या संगणकशास्त्र विद्याशाखे अंतर्गत शिक्षणक्रमाच्या सत्रनिहाय व अंतिम/पुरवणी परीक्षेच्या नियमित विद्यार्थ्यांचे अंतर्गत **(CA) आणि प्रात्यक्षिकाचे (UA) गुण online भरणे बाबत महत्वाच्या सूचना ....**

मा. महोदय,
संगणकशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविल्या जाणा-या शिक्षणक्रमांच्या लेखी परीक्षा ०४ फेब्रुवारी २०१९ पासून आयोजित करण्यात आलेल्या आहेत. BCA, B.Sc. (BIS), Computer certificate & diploma programme, B.Sc. (Industrial Science), diploma in industrial science & MCA शिक्षणक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा अभ्यासकेंद्रावर आयोजित करण्यात येतात. सदर परीक्षेसाठी महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे

१. प्रात्यक्षिक (Practical) परीक्षा दि. ०१ मार्च ते १० मार्च २०१९ दरम्यान घेण्यात याव्यात.
२. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी ३० विद्यार्थ्यांची एक बॅच करावी. (एका दिवसात दोन बॅच याप्रमाणे परीक्षेचे आयोजन करावे.)
३. प्रात्यक्षिक परीक्षेच्या अभ्यासक्रमनिहाय को-या उपस्थिती याद्या व गुणदान याद्या विद्यापीठाच्या वेबसाइटवर अभ्यासकेंद्राच्या login मध्ये उपलब्ध आहेत. अभ्यासकेंद्रानी सदर याद्या वेबसाइटवरून डाउनलोड करून घ्याव्यात.
४. प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी उपस्थिती यादीवर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी दोन प्रतीत घेण्यात यावी. विद्यार्थ्यांची स्वाक्षरी झालेली एक प्रत विद्यापीठातील परीक्षा कक्ष २ कडे पाठवावी. आणि दुसरी प्रत अभ्यासकेंद्राने जपून ठेवावी.
५. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी वरिष्ठ बहि:स्थ परिक्षकाची नियुक्ती विभागीय केंद्राकडून करण्यात येइल.
६. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या वरिष्ठ बहि:स्थ परीक्षकाचे मानधन व प्रवास आणि दैनिक भत्ता विभागीय केंद्रामार्फत देण्यात येइल.
७. Home Assignment (CA), Practical Exam (UA), Project Exam {Internal (CA), External (UA)}च्या उपस्थिती याद्या व गुणदान याद्यांची प्रत अभ्यासकेंद्राने विद्यापीठ परीक्षा कक्ष – २ कडे पाठवावी व दुसरी प्रत स्वत:कडे जपून ठेवावी.
८. वरील याद्यांच्या स्कॅन प्रतींची एकत्रित PDF फाईल तयार करून examcomp.ycmou@gmail.com या ईमेलवर पाठवावी.

Scanned by CamScanner

९. Home Assignment (CA), Practical Exam (UA), Project Exam {Internal (CA), External (UA)}मधील गुणांची (गुणदान याद्याप्रमाणे) ऑनलाइन नोंद दि. ११ मार्च २०१९ पर्यंत करणे बंधनकारक आहे. दि. ११ मार्च २०१९ तारखेनंतर ऑनलाइन इंट्री करावयाची असल्यास पुढीलप्रमाणे दंडाची रक्कम अभ्यासकेंद्राला भरावी लागेल.

क्र.	कालावधी	दंडाची रक्कम
१	दि. १२ ते २० मार्च २०१९	रू. १०००-/
२	दि. २१ ते ३० मार्च २०१९	रू. ३०००-/

१०. गुणांची ऑनलाइन इंट्री वरील मुदतीत केली नाही तर अभ्यासकेंद्राचा निकाल राखीव ठेवण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत मा. कुलगुरुंची मान्यता मिळाल्यानंतरच त्यांनी मान्य केलेला दंड आकारून निकाल जाहिर केला जाईल.

११. प्रात्यक्षिक (Practical) परीक्षेच्या विद्यार्थी संख्येचा डेटा सोबत जोडला आहे.

१२. Practical आणि CA गुणांची Data Entry करण्यसाठी विद्यापीठाच्या पोर्टलवर (www.ycmou.digitaluniversity.ac) लॉगीन करावे. यानंतर खालील स्टेप्स प्रमाणे Mark Entry करून Mark Publish करावेत.

Steps for Data Entry

1. Login on – www.ycmou.digitaluniversity.ac
2. Click on - Examination Tab
3. Click on - Post Examination Tab
4. Click on - Assessment Data Entry Tab
5. Click on - Data Entry Tab

Steps for Publish Entered Marks

1. Click on - Examination Tab
2. Click on - Post Examination Tab
3. Click on - Assessment Data Entry Tab
4. Click on - Data Synchronization Tab
5. Click on - Submit data to University/ERPS Tab
6. Click on - Submit Student –Paper Assessment data to University/ERPS Tab

(महत्वाचे : मार्क एंट्री करण्यापुर्वी विद्यापीठाच्या पोर्टवरील Presentation Tab मधील अं. क्र. 11 - How to do mark entry आणि 12 – How to Publish Paper Mark Entry हे Presentation बघावेत.) mark entry साठी विभागीय केंद्राकडून मिळालेल्या अभ्यासकेंद्राच्या Login Id चा वापर करावा. मार्क एन्ट्रीसाठी लॉगीन तयार करण्यासंदर्भातील Presentation अ. क्र. 20 - Online Registration (Create Login) for examination Coordinators (for Mark entry) उपलब्ध आहे.)
(Presentation Link - http://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=26784)

मानधन देयक अदा करण्याबाबत सूचना

Scanned by CamScanner

१. मानधन दर तक्त्याप्रमाणे (परीक्षा कार्यपुस्तिका) परीक्षा आयोजनामध्ये सहभागी व्यक्तीचे मानधन विभागीय केंद्राने अदा करावे. (परीक्षा मानधन देयके विभागीय केंद्राशी संपर्क साधून प्राप्त करुन घेणे)
२. मानधन देयक अदा करतांना अभ्यासकेंद्राच्या सही शिक्यासह व्यक्तीची देयकावर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. (देयकासोबत बैंक पासबुकची झेरोक्स, पैन कार्ड झेरोक्स, आधाराकार्डची झेरोक्स जोडावी.)
३. संकीर्ण खर्च लेखी परीक्षेसाठी रु. ६००/- व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी रु. ३००/- देय आहे.
४. परीक्षा मानधन देयके पूर्ण करून विभागीय केंद्राकडे जमा करण्यात यावीत.

इतर सूचना

१. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी व त्यासाठी आवश्यक सूचना परीक्षा कालावधीत नोटिस बोर्डवर लावण्यात याव्यात. तसेच परीक्षा हॉलमध्ये परीक्षा सुरु होण्यापूर्वी या सूचना विद्यार्थ्यांना वाचून दाखवाव्यात.
२. आसनव्यवस्थेसंदर्भात आवश्यक माहिती विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी बोर्डवर लिहिण्यात यावी.
३. परीक्षेसंदर्भात काही अडचणी असल्यास मुख्यालयाच्या परीक्षा विभागाशी संपर्क साधावा. (राजू जगताप – 9403774621, सतीश पाटील सर – 9403774784)

कळावे.

परीक्षा नियंत्रक

प्रत :- मा. संचालक, य.च.म.मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नांदेड

Scanned by CamScanner